**म.सं.कौ.हिं.का.अर्ज ३१/२०२४ मधील नि.क्र.१८ खालील आदेश**
***CNR : MHSN06000929-2024***
**(रुपाली सकटे वि. सचिन सकटे)**

सदरचा अर्ज हा जाबदार यांनी अर्जदार हिने तिचे खातेसंदर्भात माहिती तसेच मिळकतीसंदर्भात उतारे व इनकम टॅक्स रिटर्न दाखल करणेविषयी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०२.** जाबदार तर्फे वकील श्री.आय.बी. पालेगार आणि अर्जदार तर्फे वकील श्री. एस.एस. वाटवे यांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** जाबदारतर्फे युक्तीवाद केला की, प्रस्तुतचे प्रकरण हे कलम २३ प्रमाणे अंतरिम अर्जाचे युक्तीवादाकरिता प्रलंबित आहे. पुढे त्यांनी युक्तीवाद केला की, यातील अर्जदार ही फार्मासिस्ट या पदावर कार्यरत होती. तसेच अर्जदार क्र.१ हिचे मूळ गावी शेती आहे व त्या शेतमिळकतीतून अर्जदार हिला उत्पन्न मिळते. त्यासंदर्भात अर्जदार हिने अभिलेखावर कागदपत्रे हजर केलेली नाहीत. तसेच अर्जदार हिने तिने भरलेले आयकर विवरण पत्र, तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेतील खातेउतारा हजर केलेला नाही. यातील अर्जदार ही उच्च शिक्षित असून पूर्वी नोकरी करीत होती. तसेच अर्जदार हिला शेतीपासून उत्पन्न मिळते. त्यामुळे सदर केसचे कामी अंतरिम पोटगीच्या आदेशाकरिता अर्जदार हिची सध्याची आर्थिक स्थिती कोर्टासमोर येणे गरजेचे आहे. सदरचे कागदपत्रे अर्जदार हिने दाखल करणेसंबंधी आदेश होणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदार हिला अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर करणेविषयी आदेश व्हावा अशी विनंती केली. जाबदार तर्फे वकीलांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा प्रसाद कुराडे वि. निकिता कुराडे २०१६ ऑल एम.आर.(क्रि.)२३०० या न्यायानिवाडयाचा आधार घेतला.

**०४.** याउलट अर्जदारतर्फे वकीलांनी युक्तीवाद केला की, सद्यस्थितीत अर्जदार ही कोठेही नोकरीस जात नाही. तसेच जाबदार यांनी अर्जात नमूद केलेली शेतजमीन ही वडिलोपार्जित शेतजमीन असून सदर शेतजमिनीस बारामाही सिंचन व्यवस्था नसल्यामुळे शेतजमीन पडीक आहे. तसेच जाबदार याच्या कथनाप्रमाणे अर्जदार हिला शेतीपासून उत्पन्न मिळत नाही. तसेच पुढे युक्तीवाद केला की, यातील जाबदार क्र.१ यांनी त्यांचेवर असलेली जबाबदारी पूर्ण केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिने प्रस्तुतचे प्रकरण दाखल केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांचा अंतरिम अर्जावर युक्तीवाद पूर्ण झालेला असून केवळ काम प्रलंबित ठेवण्याच्या उददेशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. तरी तो नामंजूर करावा अशी विनंती केली. त्याचप्रमाणे अर्जदार हिने अभिलेखावर जाबदाराचे मागणीप्रमाणे तिचेकडील कागदपत्रे दाखल केलेली असल्याने सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन केले. यातील अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचार कायदा कलम १२ प्रमाणे अर्ज दाखल केलेला असून कलम २३ प्रमाणे अंतरिम अर्ज दाखल केलेला आहे. त्याचप्रमाणे अर्जदार हिने तिचे मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदर केसचे कामी अर्जदारतर्फे वकीलांनी कलम २३ प्रमाणे अंतरिम अर्जावर आपला युक्तीवाद केलेला आहे. त्यानंतर सदरचा अर्ज जाबदार यांनी दाखल केलेला आहे. जाबदार यांनी अर्जदार हिचे कर विवरणपत्र, बँकेकडील खातेउतारा तसेच मिळकतीचे उतारे अर्जदार हिने सादर करणेबाबत आदेश होणेविषयी विनंती केलेली आहे. सदर केसचे कामी अर्जदार हिने दि.०३/०२/२०२५ रोजी नि.२२ प्रमाणे बँकेकडील खातेउतारा, मिळकतीचे खातेउतारे, पॅनकार्ड यांच्या प्रती दाखल केलेल्या आहेत. सदरचे प्रकरण हे कलम २३ प्रमाणे अंतरिम अर्जाच्या जाबदारतर्फे युक्तीवादावर असून प्रकरण हे प्राथमिक स्टेजला आहे. तसेच अर्जदार हिने जाबदार याच्या अर्जाप्रमाणे कागदपत्रे सादर केली असल्याने जाबदार यांच्या अर्जाचा उददेश सफल झालेला आहे. त्यामुळे जाबदार याच्या विनंतीप्रमाणे अर्जदार हिला आदेशित करणे सद्यस्थितीत योग्य वाटत नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**०१.** नि.क्र. १८ चा अर्ज नामंजुर करणेत येतो.

**०२.** जाबदार यांना निर्देशित करणेत येते की, त्यांनी पुढील नेमले तारखेस कलम २३ प्रमाणे अंतरिम अर्जावर आपला युक्तीवाद न चुकता करावा. अन्यथा जाबदार यांचे युक्तीवादाविना कलम २३ प्रमाणे अंतरिम अर्ज आदेशाकरिता विचारात घेण्यात येईल.

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.03.01 17:33:54 +0530

**(श्री. ए. एस. राणे)**

**दि.०१.०३.२०२५** **तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer: Smt. S. P. Patil
Name of the Court : Shri. A. S. Rane,
3rd Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C., Miraj.
Date of Decision : 01/03/2025
Order signed by
the presiding officer on : 01/03/2025
Order uploaded on : 01/03/2025